# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 20.03.2024 वारः बुधवार**

---

1.आगामी लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगाकडून अधिसूचना जारी
2.स्टार्टअपमधील उद्योजक आणि गुंतवणूकदारांचा महाकुंभमध्ये लक्षणीय सहभाग
3.चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर संकलनात एकंदर 18 टक्क्यांनी वाढ
4.नागरिकत्व सुधारणा कायद्यावर स्थगिती आणण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार
5.स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारांत गायत्री गोपीचंद आणि ट्रिसा जॉली जोडीचा उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**निवडणुका-अधिसूचना**
आगामी लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगाने आज अधिसूचना जारी केली. या टप्प्यात 17 राज्ये आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधील लोकसभेच्या 102 जागांवर निवडणुका होणार आहेत. तामिळनाडूतील ३९ जागा, राजस्थानमधील १२, उत्तर प्रदेशच्या आठ, मध्य प्रदेशच्या सहा, उत्तराखंड, आसाम आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी पाच जागा, बिहारच्या चार जागा, पश्चिम बंगालच्या तीन जागा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि मेघालय मधील प्रत्येकी दोन जागा, तर, छत्तीसगड, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार बेटे, जम्मू आणि काश्मीर, लक्षद्वीप आणि पुद्दुचेरीमधील प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होणार आहे. या टप्प्यातील निवडणुकांसाठी या महिन्याच्या २७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. नामनिर्देशनपत्रांची छाननी या महिन्याच्याच २८ तारखेला होणार असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ३० मार्च आहे. बिहारसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २८ मार्च असून, ३० तारखेला उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख २ एप्रिल आहे. या सर्व मतदारसंघांमध्ये १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ६ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

**स्टार्टअप महाकुंभ**
स्टार्टअप महाकुंभ मेळाव्यात आघाडीचे गुंतवणूकदार, नव प्रवर्तक, आणि महत्त्वाकांक्षी नव उद्योजकांनी लक्षणीय सहभागाचा विक्रम प्रस्थापित केला आहे. दोन हजाराहून अधिक स्टार्ट अप आणि एक हजाराहून जास्त गुंतवणूकदारांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. गेल्या दोन दिवसात घडलेल्या भविष्यातील स्टार्टअपमधील गुंतवणूक कशी करता येईल याबाबत महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.
भारताच्या आर्थिक वृद्धी आणि विकासामध्ये स्टार्टअपचे महत्त्व यावर उद्योजक आणि धोरणकर्त्यांनी मार्गदर्शन केलं. नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर झालेल्या स्टार्ट अप महाकुंभ मेळाव्यात डीप टेक , कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषि तंत्रज्ञान, वित्तीय तंत्रज्ञान इत्यादी 10 संकल्पनाधारीत स्वतंत्र विभाग उभारण्यात आले आहेत. या कार्यक्रमामुळे गुंतवणूकदार, नव उद्योजक, उद्योजकां मधील परस्पर संपर्क दृढ होण्यासाठीचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

**कर-संकलन**
चालू आर्थिक वर्षात कर संकलन 18 पुर्णांक 74 टक्क्यांनी वाढलं आहे. 2022-23 च्या तुलनेत यावर्षी थेट कर संकलन 18 लाख 75 हजार कोटी रुपयांनी वाढून 22 लाख 27 हजार कोटी रुपये झालं आहे. अशी माहिती अर्थमंत्रालयानं काल दिली. यामध्ये
कॉर्पोरेट कर, वैयक्तिक कर, रोखे व्यवहारांवरील करांचा समावेश आहे. कॉर्पोरेशन कर म्हणून 10 लाख 98 हजार कोटी रुपयांहून अधिक जमा झाले, तर रोखे व्यवहारांवरील करांसह वैयक्तिक आयकर 11 लाख 25 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त नोंदवला गेला.
3 लाख 36 हजार 808 कोटी रुपये इतका परतावा जारी करण्यात आला असून मागील वर्षाच्या परताव्याच्या तुलनेत 12 पुर्णांक 74 टक्के जास्त आहे. अशी माहितीही मंत्रालयानं दिली.

**सी ए ए**
नागरिकत्व सुधारणा कायद्याला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयानं काल नकार दिला. त्याचबरोबर या कायद्याविरोधात गेल्या आठवड्यात दाखल झालेल्या 237 याचिकांना उत्तर देण्यासाठी तीन आठवड्यांचा अवधी केंद्र सरकारला दिला आहे.
या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्र यांनी सुनावणी केली. याचिका कर्त्यांमध्ये इंडियन युनियन मुस्लिम लीग, काँग्रेसचे नेते जयराम रमेश आणि आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईत्रा यांचा समावेश आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी 9 एप्रिल रोजी होणार आहे.

**मतदान**

माध्यमांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना टपालाद्वारे मतदान करण्यास  निवडणूक आयोगानं काल परवानगी दिली. आयोगानं काल यासंदर्भातील अधिसूचना जारी केली. यापूर्वी अत्यावश्यक सेवेत असणारे कर्मचारीच  पोस्टाद्वारे मतदान करू शकत होते. आता माध्यम क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील ही सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी आयोगातर्फे मध्यवर्ती अधिकाऱ्याची  नियुक्ती केली जाणार आहे.

**युरोपिअन-प्रॉफिट**

युरोपमध्ये गोठवलेल्या अब्जावधी युरोच्या रशियन मालमत्तेतून मिळणारा नफा युक्रेनसाठी शस्त्रे आणि इतर निधी उपलब्ध करून देण्यासाठी वापरण्यासंदर्भात योजना आखावी असा दबाव युरोपिअन राष्ट्रांकडून आणला जात आहे, असं एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. युरोपिअन राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण प्रमुख जोसेप बोरेल यांना या आठवड्यात ब्लॉकच्या बहुतेक परराष्ट्र मंत्र्यांकडून योजनेसाठी हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे आजपासून ब्रुसेल्स इथं होणाऱ्या शिखर परिषदेत युरोपिअन राष्ट्रांचे नेते मान्यता देतील अशी अपेक्षा  बोरेल यांनी व्यक्त केली. युक्रेनला सध्या निधीची कमतरता आहे आणि अमेरिकन काँग्रेसनं मंजूर केलेला निधी अजून वितरीत न झाल्यानं युक्रेनवरील संकट बिकट झालं आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. 27 देशांच्या संघटनेत 217 बिलीअन डॉलर्सची संपत्ती सध्या बेल्जिअममध्ये गोठवण्यात आली आहे.  यातून प्रतीवर्षी सव्वीतीन बिलीअन डॉलर्स एवढं व्याज या गटाला मिळतं आहे.

**बेलारूस**

बेलारुसनं मुंबईत प्रथमच आपला स्वतंत्र वाणिज्य दूतावास सुरु केला असून बेलारूस भारतासोबत व्यापार, व्यवसाय, पर्यटन आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्यास उत्सुक आहे. या दृष्टीनं बेलारुसमधील ब्रेस्ट प्रांत,  महाराष्ट्रासोबत सहकार्य करार करण्यास प्रयत्नशील आहे अशी माहिती मुंबईतील बेलारुसचे नवनियुक्त वाणिज्यदूत अलियाक्सांद्र मात्सुकोऊ यांनी दिली.  मात्सुकोऊ यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली.

दरम्यान, मानवतावादी नातेसंबंध दृढ करण्यासाठी पुण्याजवळच्या अनाथालायातील तीस मुलांना बेलारूस सरकारतर्फे बेलारुसची सफर घडवण्यात येणार आहे.

बेलरूसच्या वाणिज्यदूतांनी भारतात पर्यावरणाच्या  संवर्धनासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांचं कौतुक केलं. बेलारुस मधल्या विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सहकार्य, विद्यार्थी, प्राध्यापक तसंच सांस्कृतिक देवाणघेवाण वाढावी अशी अपेक्षा राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या भूतान  दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यामध्ये ते भुतानाचे राजे जिग्मे खेसर  नामग्येल वांगचूक  आणि भुतानचे चौथे राजे जिग्मे सिंग्ये वांगचूक यांची भेट घेतील.   या दौऱ्यादरम्यान भुतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे यांच्याशीदेखील चर्चा करणार आहेत.   या भेटीमुळे  द्विपक्षीय आणि प्रादेशिक हिताच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची, तसेच या दोन्ही देशांच्या नागरिकांमधील परस्पर हितसंबंध दृढ करण्याची संधी मिळणार आहे.

**लोकसेवा आयोग**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा पूर्व परीक्षा 2024 पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. नागरी सेवा विभागातील पदांबरोबरच भारतीय वन सेवा विभागातील पदांसाठीची निवड देखील याच पूर्व परीक्षेतून होत असते. 26 मे 2024  रोजी होणारी ही परीक्षा आता 16 जून 2024 रोजी  होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगानं  हा निर्णय घेतला आहे.

**सर्वोच्चन्यायालय राष्ट्रवादी काँग्रेस**

लोकसभा तसंच विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार हे नांव आणि तुतारी वाजवणारा माणूस हे पक्ष चिन्ह वापरायला सर्वोच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. निवडणूक आयोगालाही या नावाला आणि निवडणूक चिन्हाला मान्यता देण्याचे आदेश न्यायालयानं दिले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार आणि अजित पवार गटातल्या वादावर काल सर्वोच्च न्यायालयानं अंतरिम आदेश जारी केला.

दरम्यान, अजित पवार गटानं आपलं घड्याळ हे चिन्ह वापरण्याबाबतचा निर्णय न्यायालयाच्या अधीन असल्याचं निवेदन जारी करावं असं न्यायालयानं सांगितलं आहे.

घड्याळ चिन्ह अजित पवार गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

**लक्ष्य-सेन**

जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत, पुरुष एकेरी गटात भारताच्या लक्ष्य सेननं पाच स्थानांची झेप घेतली असून तो आता क्रमवारीत 13 स्थानावर आहे. त्यानं नुकत्याच झालेल्या फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धा आणि ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यफेरीत धडक मारली होती. या कामगिरीच्या जोरावर लक्ष्यनं गेल्याच आठवड्यात पॅरिस इथं होणाऱ्या ऑलिंपिक पात्रता मानांकनात स्थान मिळवलं होतं. जागतिक क्रमवारीत पहिल्या सोळांत स्थान मिळवणारे खेळाडू  ऑलिम्पिकसाठी पात्र ठरणार आहेत.

**स्विस-खुल्या-बॅड मिंटन-स्पर्धे**

स्वित्झर्लंड सुरु असलेल्या स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारांत भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रिसा जॉली यांनी उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. केरी झू आणि अनी झू या अमेरिकन जोडीला 32व्या फेरीत  21-15, 21-12 असं नमवत त्यांनी हा वियज मिळवला.  पुरुष दुहेरीच्या पात्रता फेरीत हरुहरण आमसकरुणन आणि रुबन कुमार या जोडीनं फ्रांसच्या नतन बेग्गा आणि बापटिस्ट लाबारथे जोडीचा  21-17, 21-15 असा पराभव केला. मिश्र दुहेरीत एन. सिक्की

रेड्डी आणि बी. सुमीत रेड्डी यांनी पात्रता फेरीत ब्राझीलच्या सामिया लिमा आणि डेवी सिल्वा यांचा 21-12, 21-17 असा पराभव केला. तत्पूर्वी पुरुष एकेरी पात्रता फेरीत सतीश कुमार करुणाकरन, साल्वाडोरच्या उरीएल कांजुराचा 21-18, 21-12 असा पराभव केला, तर समीर वर्माने ब्राझीलच्या कोएल्हो डी ऑलिव्हेराचा 21-11, 21-10, 21-14 असा पराभव केला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार